## नवी मुंबई महानगरपालिका

## मा.प्रशासक तथा आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका

**गुरुवार, दिनांक १८ जून २०२० रोजी भरलेल्या सभेतील मंजुर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे:-**

| | |
|---|---|
| विषय क्र.१.<br>दि. १८ जून २०२० | नवी मुंबई महानगरपालिका, परिहवन उपक्रमांसाठी सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता लागणारे ऑईल, ग्रीस आणि कुलंट खरेदीसाठी जाहिर ई-निविदा मागविणेस प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत, परिहवन व्यवस्थापक यांचे दिनांक १२/०६/२०२०,चे पत्र जा. क्र. नमुंमपा/परि/ खरेदी/८६/२०२०. |
| ठराव क्र.१९. | "उपरोक्त संदर्भात नवी मुंबई महानगरपालिका, परिहवन उपक्रमांसाठी सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता लागणारे ऑईल, ग्रीस आणि कुलंट खरेदीसाठी जाहिर ई-निविदा मागविणेस प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत सन २०२०-२०२१ वर्षाकरीता आवश्यक ऑईल, ग्रीस आणि कुलंटची खरेदी करणेस अंदाजे एकूण रक्कम रु. ४९,७७,१६१/- (अक्षरी रक्कम रु. एकोणपन्नास लक्ष सत्याहत्तर हजार एकशे एकसष्ट मात्र) इतक्या खर्चास व खरेदी, जाहिर ई-निविदा मागवून प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३४३(१) अन्वये मा. प्रशासक यांची प्रशासकीय मान्यता देण्यात यावी." |

**निर्णय :-**

ठराव करण्यात येतो की,

नवी मुंबई महानगरपालिका, परिहवन उपक्रमांसाठी सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता लागणारे ऑईल, ग्रीस आणि कुलंट खरेदीसाठी जाहिर ई-निविदा मागविणेस प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत प्रशासकीय मान्यता मिळणेकरीता सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.

| Sr.No | Description | Lit./Kg | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Engine Oil 15w40 API CI-4 (Diesel) | 2000 | 125.67 | 2,51,340.00 |
| 2 | Engine Oil 15w40 API CH-4 (Bs-III/CNG) | 10000 | 132.33 | 13,23,300.00 |
| 3 | Diff Oil 140 (CNG) 85w 140,GL-5 | 3000 | 136.20 | 4,08,600.00 |
| 4 | Gear Oil 90 80w90 XP Max | 4300 | 137.50 | 5,91,250.00 |
| 5 | Power Steering Oil Dura Max | 2300 | 149.00 | 3,42,700.00 |
| 6 | Coolant Concentrated (ethylene gloycol antifree coolant) | 9300 | 120.37 | 11,19,441.00 |
| 7 | Engine Oil 15w40 (Jan Bus) API CI-4 Plus Duro | 1800 | 150.83 | 2,71,494.00 |
| 8 | Diff Oil 85w140 (Jan Bus) DB Dura Max | 800 | 150.27 | 1,20,216.00 |
| 9 | Coolant (Jan Bus) Euro Coll LL Max 50 | 2000 | 107.37 | 2,14,740.00 |
| 10 | Bearing Grease RR3 | 1200 | 158.06 | 1,89,672.00 |
| 11 | Chassis Grease | 1200 | 120.34 | 1,44,408.00 |
| | | | Total Amount | 49,77,161.00 |

त्यानुसार विषय क्रमांक १ ठराव क्रमांक १९ अन्वये उपरोक्त तक्त्यातील नमूद करण्यात आलेल्या बाब क्रमांक १ ते ११ नुसार सन २०२०-२०२१ वर्षाकरीता आवश्यक ऑईल, ग्रीस आणि कुलंटची खरेदी करणेस अंदाजे एकूण रक्कम रु. ४९,७७,१६१/- (अक्षरी रक्कम रु. एकोणपन्नास लक्ष सत्याहत्तर हजार एकशे एकसष्ट मात्र) इतक्या खर्चास व खरेदी, जाहिर ई-निविदा मागवून प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. प्रशासक यांची प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(चित्रा बाविस्कर)** | **(अण्णासाहेब मिसाळ)** |
| **नगरसचिव** | **आयुक्त तथा प्रशासक** |
| **नवी मुंबई महानगरपालिका** | **नवी मुंबई महानगरपालिका** |

| | |
|---|---|
| विषय क्र.२. दि. १८ जून २०२० | परिवहन उपक्रमाच्या एसी वोल्वो बसेसवर जाहिरात प्रदर्शित करण्याचे हक्क देण्याबाबतच्या कंत्राटास मंजूरी मिळणेबाबत, परिहवन व्यवस्थापक यांचे दिनांक १५/०६/२०२०,चे पत्र जा. क्र. नमुंमपा/परि/अभि/४९/२०२०. |
| ठराव क्र.२०. | "उपरोक्त संदर्भात परिवहन उपक्रमाच्या एसी वोल्वो बसेसवर जाहिरात प्रदर्शित करण्याचे हक्क देण्याबाबत निविदेच्या अनुषंगाने प्रथम तीन वर्षे कालावधीत एकूण रक्कम रु. ५,०१,३८,४००/- (अक्षरी रक्कम रु. पाच कोटी एक लक्ष अडोतीस हजार चारशे मात्र) इतक्या अपेक्षित महसूली उत्पन्नाची मे. श्रीबालाजी कन्सल्टंट यांची निविदा आढाव्यानंतर दोन वर्षे कालावधी वाढीसह निविदा स्विकृती व करारनामा करण्याच्या मंजूरीच्या प्रस्तावास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३४३(१) अन्वये मा. प्रशासक यांची प्रशासकीय मान्यता देण्यात यावी." |

**निर्णय :-**

ठराव करण्यात येतो की,

परिवहन उपक्रमाच्या एसी वोल्वो बसेसवर जाहिरात प्रदर्शित करण्याचे हक्क देण्याबाबत प्रशासकीय मान्यता मिळणेकरीता सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.

| कंत्राट वर्ष | प्रति बस मासिक दर (M/s.Sreebalajee | |
|---|---|---|
| | निविदा दर | सुधारीत वाढीव दर |
| प्रथम | २०,३५५/- | २०,४००/- |
| व्दितीय | २१,३७३/- | २१,४००/- |
| तृतीय | २२,४४१/- | २२,४८०/- |
| चतुर्थ | २३,५६३/- | २३,६००/- |
| पाचवे | २४,७४१/- | २४,७८०/- |

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने लागू असणारे सर्व शासकीय कर व शुल्क इत्यादींचा भरणा करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. तसेच सद्याच्या व बदल झाल्यास त्यानुसार आणि CMVR, RTO व इतर लागू होणा-या नियमांनुसार जाहिरात प्रदर्शित करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

| कंत्राट वर्ष | प्रति बस मासिक दर | सद्या ६५ बसेस बहिर्गमन नुसार | |
|---|---|---|---|
| | | मासिक महसूल | वार्षिक महसूल |
| प्रथम | २०,४००/- | १३,२६,०००/- | १,५९,१२,०००/- |
| व्दितीय | २१,४००/- | १३,९१,०००/- | १,६६,९२,०००/- |
| तृतीय | २२,४८०/- | १४,६१,२००/- | १,७५,३४,४००/- |
| | | ३ वर्षाकरीता एकूण | ५,०१,३८,४००/- |

त्यानुसार विषय क्रमांक २ ठराव क्रमांक २० अन्वये उपरोक्त तक्त्यातील नमूद करण्यात आलेल्या बाबींसह निविदेच्या अनुषंगाने प्रथम तीन वर्षे कालावधीत एकूण रक्कम रु. ५,०१,३८,४००/- (अक्षरी रक्कम रु. पाच कोटी एक लक्ष अडोतीस हजार चारशे मात्र) इतक्या अपेक्षित महसूली उत्पन्नाची मे. श्रीबालाजी कन्सल्टंट यांची निविदा आढाव्यानंतर दोन वर्षे कालावधी वाढीसह निविदा स्विकृती व करारनामा करण्याच्या मंजूरीच्या प्रस्तावास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३४३(१) अन्वये मा. प्रशासक यांची प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(चित्रा बाविस्कर)** | **(अण्णासाहेब मिसाळ)** |
| **नगरसचिव** | **आयुक्त तथा प्रशासक** |
| **नवी मुंबई महानगरपालिका** | **नवी मुंबई महानगरपालिका** |

| | |
|---|---|
| विषय क्र.३. दि. १८ जून २०२० | नवी मुंबई महानगरपालिकेस प्रवासी वाहतुकीचा परवाना असलेली कार व जीप वाहने भाडेतत्वावर पुरविणेसाठीच्या मे. पुर्वा ट्रॅव्हल्स यांच्या कंत्राटास मुदतवाढ देणेबाबत, आयुक्त यांचे दिनांक १७/०६/२०२०,चे पत्र जा. क्र. नमुंमपा/वाहन/२३०/२०२०. |
| ठराव क्र.२१. | "उपरोक्त संदर्भात नवी मुंबई महानगरपालिकेस प्रवासी वाहतुकीचा परवाना असलेली कार व जीप वाहने भाडेतत्वावर पुरविणेसाठीच्या मे. पुर्वा ट्रॅव्हल्स यांच्या कंत्राटास मुदतवाढ देणेबाबत प्रस्तावित केल्याप्रमाणे मे. पूर्वा ट्रॅव्हल्स यांच्या कंत्राटास दि. ०१/०२/२०२० ते ३०/०६/२०२० पर्यंतच्या ०५ महिने कालावधीसाठी किंवा नविन कंत्राटाचा कार्यादेश निर्गमित होईपर्यंत (जे आधी पूर्ण होईल ते) मुदतवाढ देणेकरीता निविदेच्या अटी व शर्तीनुसार व निश्चित केलेल्या दरानुसार अवातानुकूलीत वाहनासाठी मासिक रक्कम रु. २६,५७०/- व वातानुकूलीत वाहनासाठी मासिक रक्कम रु. २९,९८८/- प्रत्येकी या दराप्रमाणे एकूण ८९ वाहनांकरीता रक्कम रु.१,१९,६०,३७०/- (अक्षरी रु. एक कोटी एकोणीस लक्ष साठ हजार तीनशे सत्तर मात्र) एवढ्या खर्चास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार मा. प्रशासक यांची प्रशासकीय मान्यता देण्यात यावी." |
| निर्णय :- | ठराव करण्यात येतो की,<br>नवी मुंबई महानगरपालिकेस प्रवासी वाहतुकीचा परवाना असलेली कार व जीप वाहने भाडेतत्वावर पुरविणेसाठीच्या मे. पुर्वा ट्रॅव्हल्स यांच्या कंत्राटास मुदतवाढ देणेबाबत सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ३ ठराव क्रमांक २१ अन्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे मे. पूर्वा ट्रॅव्हल्स यांच्या कंत्राटास दि. ०१/०२/२०२० ते ३०/०६/२०२० पर्यंतच्या ०५ महिने कालावधीसाठी किंवा नविन कंत्राटाचा कार्यादेश निर्गमित होईपर्यंत (जे आधी पूर्ण होईल ते) मुदतवाढ देणेकरीता निविदेच्या अटी व शर्तीनुसार व निश्चित केलेल्या दरानुसार अवातानुकूलीत वाहनासाठी मासिक रक्कम रु. २६,५७०/- व वातानुकूलीत वाहनासाठी मासिक रक्कम रु. २९,९८८/- प्रत्येकी या दराप्रमाणे एकूण ८९ वाहनांकरीता रक्कम रु.१,१९,६०,३७०/- (अक्षरी रु. एक कोटी एकोणीस लक्ष साठ हजार तीनशे सत्तर मात्र) प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. प्रशासक यांची प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे. |

सही/-

**(चित्रा बाविस्कर)**
**नगरसचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**

सही/-

**(अण्णासाहेब मिसाळ)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**नवी मुंबई महानगरपालिका**

| | |
|---|---|
| विषय क्र.४. दि. १८ जून २०२० | दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरीता यापुर्वी वाटप केलेल्या लाभार्थीना मा. महापालिका सर्वसाधारण सभा मंजूर ठराव क्र. १९५२, दि. १४/०९/२०१७ व मा. महापालिका सर्वसाधारण सभा मंजूर ठराव क्र. ४४४, दि. २४/०७/२०१८ प्रमाणे धोरणाची पूर्तता विहित मुदतीत न करु शकलेले दिव्यांगांना पुनश्च मुदतवाढ देऊन जागा वितरित करणेबाबत, आयुक्तांचे दिनांक १७/०६/२०२०, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/मालमत्ता/९२६/२०२०. ( संदर्भ :- शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४, दि. २८/०४/२०२०) |
| ठराव क्र.२२. | "उपरोक्त संदर्भात दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरीता यापुर्वी वाटप केलेल्या लाभार्थीना मा. महापालिका सर्वसाधारण सभा मंजूर ठराव क्र. १९५२, दि. १४/०९/२०१७ व मा. महापालिका सर्वसाधारण सभा मंजूर ठराव क्र. ४४४, दि. २४/०७/२०१८ प्रमाणे धोरणाची पूर्तता विहित मुदतीत न करु शकलेले दिव्यांगांना पुनश्च मुदतवाढ देऊन जागा वितरित करणेबाबत प्रस्तावित केल्याप्रमाणे श्रीम. पार्वती पोपट शेडगे यांनी स्टॉल क्र. ३, सेक्टर-१०, कोपरखैरणे, नवी मुंबई, श्री. रुपेश जनार्दन म्हात्रे, स्टॉल क्र. २०, सेक्टर-९ एन, सी.बी.डी. नवी मुंबई, तसेच श्रीम. सुवर्णलता विष्णु जठार यांना सी-५/११, लगतचे उद्यान, सेक्टर-४, सी.बी.डी. बेलापूर नवी मुंबई उक्त धोरणानुसार विहित मुदतीत त्यांनी अर्ज सादर केलेला नाही. मा. महापालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ४४४, दिनांक २४/०७/२०१८ मंजूर ठरावाप्रमाणे विहित मूदतीत अर्ज न सादर करु शकलेले उपरोक्त ३ दिव्यांग स्टॉल धारकांकडून विहीत प्रक्रिया पूर्ण करुन त्यांना मुदतवाढ देऊन भाडे वसुल करण्यास व मा. महापालिका सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या १०३ दिव्यांग्याच्या यादीमध्ये सदर तीन नावे समाविष्ट करण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार मा. प्रशासक यांची प्रशासकीय मान्यता देण्यात यावी." |
| निर्णय :- | ठराव करण्यात येतो की,<br>दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरीता यापुर्वी वाटप केलेल्या लाभार्थीना मा. महापालिका सर्वसाधारण सभा मंजूर ठराव क्र. १९५२, दि. १४/०९/२०१७ व मा. महापालिका सर्वसाधारण सभा मंजूर ठराव क्र. ४४४, दि. २४/०७/२०१८ प्रमाणे धोरणाची पूर्तता विहित मुदतीत न करु शकलेले दिव्यांगांना पुनश्च मुदतवाढ देऊन जागा वितरित करणेबाबत सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ४ ठराव क्रमांक २२ अन्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे श्रीम. पार्वती पोपट शेडगे यांनी स्टॉल क्र. ३, सेक्टर-१०, कोपरखैरणे, नवी मुंबई, श्री. रुपेश जनार्दन म्हात्रे, स्टॉल क्र. २०, सेक्टर-९ एन, सी.बी.डी. नवी मुंबई, तसेच श्रीम. सुवर्णलता विष्णु जठार यांना सी-५/११, लगतचे उद्यान, सेक्टर-४, सी.बी.डी. बेलापूर नवी मुंबई उक्त धोरणानुसार विहित मुदतीत त्यांनी अर्ज सादर केलेला नाही. मा. महापालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ४४४, दिनांक २४/०७/२०१८ मंजूर ठरावाप्रमाणे विहित मूदतीत अर्ज न सादर करु शकलेले उपरोक्त ३ दिव्यांग स्टॉल धारकांकडून विहीत प्रक्रिया पूर्ण करुन त्यांना मुदतवाढ देऊन भाडे वसुल करण्यास व मा. महापालिका सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या १०३ दिव्यांग्याच्या यादीमध्ये सदर तीन नावे समाविष्ट करण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. प्रशासक यांची प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(चित्रा बाविस्कर)** | **(अण्णासाहेब मिसाळ)** |
| **नगरसचिव** | **आयुक्त तथा प्रशासक** |
| **नवी मुंबई महानगरपालिका** | **नवी मुंबई महानगरपालिका** |